# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 14 जुलै 2026 | पान- 1


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीनंतर तातडीचा निर्णय

## मोशी दुर्घटनेच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय तांत्रिक समिती गठित



**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात वरिष्ठ अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि आमदार महेश लांडगे यांची तातडीची बैठक घेऊन संपूर्ण घटनाक्रमाचा सविस्तर आढावा घेतला होता. या बैठकीत दुर्घटनेची निष्पक्ष, सखोल आणि तांत्रिक चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले होते. त्या अनुषंगाने राज्य शासनाने आज उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी समिती गठित करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे.

विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), आयआयटी मुंबईचे भू-तांत्रिक तज्ज्ञ तसेच पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.

समिती दुर्घटनेची तात्काळ कारणे (IMMEDIATE CAUSE) आणि मूळ कारणे (ROOT CAUSE ANALYSIS) शोधून काढणार असून, SLF ची स्थिरता, तांत्रिक बाबी, सुरक्षा मानके, प्रशासकीय जबाबदारी, कंत्राटदार व संबंधित यंत्रणांची भूमिका, तसेच लागू नियमांचे पालन झाले की नाही याची सखोल चौकशी करणार आहे.

याशिवाय, दुर्घटनेपूर्वी प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना, ई-मेल, व्हॉट्सअ‍ॅप संदेश, सीसीटीव्ही फुटेज, ड्रोन सर्व्हे आणि इतर नोंदींची तपासणी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. आवश्यक असल्यास शिस्तभंग तसेच फौजदारी कारवाईबाबतही समिती शासनाला शिफारस करणार आहे. समितीने एका महिन्याच्या आत प्राथमिक अहवाल आणि दोन महिन्यांच्या आत अंतिम अहवाल शासनाला सादर करावयाचा आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व 10 प्रभाग समिती सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध!

## महापालिकेत निवडणूक प्रक्रिया शांततेत पार, अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली घोषणा





**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आज महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली.

महापालिकेच्या प्रभाग समिती सभापती पदासाठी प्रत्येक प्रभागातून एकच उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्याने सर्व प्रभाग समिती सभापती पदांची निवडणूक बिनविरोध पार पडली. या निवडणूक प्रक्रियेमध्ये विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (भा.प्र.से.) प्रजित नायर यांनी पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

या निवडणूक प्रक्रियेचे नगरसचिव उल्हास जगताप, मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रभाग अधिकारी निवेदिता घार्गे, गोरक्षनाथ लिमण, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पूजा दूधनाळे, डी.डी. कांबळे, संतोष कोराड तसेच नगरसचिव विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी काम पाहिले तर निवडणूक प्रक्रियेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

पीठासीन अधिकारी प्रजित नायर यांनी आज जाहीर केलेल्या निर्णयानुसार, 'अ' राजगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना करांडे, 'ब' सिंहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी मंदार देशपांडे, 'क' विजयदुर्ग प्रभाग समितीच्या सभापतीपदी निखिल बोऱ्हाडे, 'ड' देवगिरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी सविता खुळे, तर 'इ' शिवनेरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना सस्ते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'फ' तोरणा प्रभाग समितीच्या सभापतीपदी शिवानी नरळे, 'ग' पुरंदर प्रभाग समितीच्या सभापतीपदी मनिषा पवार, 'ह' प्रतापगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी तृप्ती कांबळे, 'ज' रायगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी आरती चोंधे आणि 'ल' लोहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी रेखा देवकर यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

प्रभाग सभापती पदाची निवडणूक पूर्ण संपल्यानंतर प्रभाग समिती सभापतींनी महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य, नगरसदस्यांची भेट घेतली.

# पवना बंदिस्त जलवाहिनी योजनेबाबत आंदोलक शेतकऱ्यांची प्रशासनाबरोबर सकारात्मक बैठक

## मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून ही बैठक झाली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळातील पवना धरण परिसरातून निगडीतील जलशुद्धीकरण केंद्राबाबतच्या पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत आंदोलनात सहभागी शेतकरी आणि प्रशासनाबरोबर सोमवारी समन्वय बैठक झाली. या बैठकीत आंदोलक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. प्रशासनाने संपूर्ण मागण्या समजावून घेऊन त्या मार्गी लावण्याची ग्वाही दिली. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकारातून ही बैठक झाली.



जलवाहिनी प्रकल्प बाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, माजी मंत्री बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी, पाठबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता प्रविण कोल्हे, मावळचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, पिंपरी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे आणि आंदोलक, धरणग्रस्त सर्व शेतकरी उपस्थित होते. सुरुवातीला खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील माहिती दिली. शेतकऱ्यांच्या मागण्यावर याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

पवना धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नाही. त्यामोबदल्यापोटीच्या जमिनीचे वाटप करावे. मावळसाठी किती पाणी आरक्षित ठेवले जाणार आहे, याचा खुलासा करावा. पाणी देण्यास आमचा विरोध नाही. मावळ तालुक्यातील गावांना शुद्ध पाणी द्यावे. आंदोलनात जखमी झालेल्यांना महापालिकेत नोकरी द्यावी. महापालिकेने धरण क्षेत्रातील विकास कामे करावीत. पवनाधरणग्रस्तांच्या कुटुंबातील सदस्यांना महापालिकेतील नोकरीसाठी पाच टक्के कोटा आरक्षित ठेवावा. पवना नदी मृत होणार नाही, पाणीसाठा जिवंत राहील, या पद्धतीने नदी स्वच्छ ठेवावी. परिसरातील गावांना स्वच्छ पाणी मिळावे, अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी बैठकीत केल्या. त्यावर जलवाहिनीच्या कामादरम्यान झालेल्या दुर्घटनेबाबत सुरुवातीलाच माफी मागून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले, गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. त्या सोडविल्या जातील. जिल्हा प्रशासन सकारात्मक आहे. सर्वांनी सकारात्मकपणे पुढे जावे. त्यात सर्वांचेच हित आहे. प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत करेल. प्रश्नांबाबत पूर्ण आश्वासन मिळाल्यानंतरच प्रकल्पाबाबत पुढील कारवाई केली जाईल. पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी म्हणाले, पवना नदीलगतची कामे हाती घेतली आहे. नदीकाठी एसटीपी उभारले जाणार आहेत. त्याची निविदा लवकरच प्रसिद्ध केली जाईल.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या जातील. पवना बंदिस्त जलवाहिनी योजना अतिशय आवश्यक आहे. नदी पात्रातील पाणी खराब झाले आहे. बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणल्यास शहरातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळेल.

> **आंदोलक शेतकऱ्यांची प्रशासनाबरोबर अतिशय सकारात्मत बैठक झाली आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या मागण्या मांडस्या आहेत. त्यापैकी किती मागण्या पूर्ण होतील, याबाबत पुन्हा एकदा जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक होईल. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक होणार आहे. शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय न होता ही योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार मावळ**

> **गेल्या अनेक वर्षांपासून पवना धरणासाठी संपादित झालेल्या शेतकऱ्यांचे प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावावेत. धरणग्रस्तांच्या मागण्या समाजावून घेऊन त्या सोडविल्यास आमचा विरोध राहणार नाही. मी पूर्णपणे मावळच्या जनतेबरोबर आहे.**
>
> **- सुनील शेळके, आमदार मावळ.**

> **आत्तापर्यंत मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रकल्पांसाठी जमिनी संपादित केल्या आहेत. पवना धरण, संरक्षण, रेल्वे, रस्ते, औद्योगिक क्षेत्रासाठी जमिनी संपादित झाल्या आहेत. आम्ही विकासाला प्राधान्य देतो. शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहचवाव्यात. मागण्या निकाली निघत असतील, तर सर्व सहमतीने निर्णय घेण्याचा विचार केला जाईल.**
>
> **- बाळा भेगडे, माजी आमदार**

# मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना जास्तीत जास्त मदत द्या; महापालिका आयुक्तांना निवेदन

## भाजपाचे विकास डोळस यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा पुढाकार; आर्थिक नुकसानभरपाई, नोकरी, घर, मुलांच्या शिक्षणासाठी मदतीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपो परिसरात अतिवृष्टीमुळे लँडफिलचा काही भाग खचून वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई, कायमस्वरूपी रोजगार, घर, मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी, अशी मागणी भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसेवक राहुल कलाटे, धर्मपाल तंतरपाळे, आरपीआयचे गटनेते कुणाल वाव्हळकर, योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, प्रा. उत्तम केंदळे, सचिन तापकीर, सागर गवळी, नवनाथ जगताप, शितल शिंदे, बापू घोलप, सागर आंघोळकर आणि सचिन सानप उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मोशी येथील दुर्घटना ही केवळ औद्योगिक अपघात नसून अनेक कुटुंबांवर कोसळलेले मोठे सामाजिक संकट आहे. या दुर्घटनेत ९ कुटुंबांचा कर्ता व्यक्ती गमावला असून त्यांच्या कुटुंबांचे उत्पन्नाचे साधन एका क्षणात संपुष्टात आले आहे. त्यामुळे केवळ शोक व्यक्त करणे किंवा मर्यादित आर्थिक मदत जाहीर करणे पुरेसे ठरणार नाही. तर, महानगरपालिका, राज्य शासन आणि संबंधित वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची ठेकेदार कंपनी, विमा कंपनी तसेच, शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला संयुक्तपणे जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी. तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसाला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नोकरी देण्यासाठी सर्वसाधारण सभेत विशेष प्रस्ताव तयार करून तो शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात यावा, अशी मागणी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना, राज्य शासनाच्या गृहनिर्माण योजना, एसआरए अथवा महापालिकेच्या उपलब्ध योजनांमधून प्रत्येक पीडित कुटुंबाला कायमस्वरूपी घर उपलब्ध करून देण्यात यावे. जखमी कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च महानगरपालिका आणि संबंधित कंपनीने संयुक्तपणे उचलावा. त्यांना विमा लाभ, पुनर्वसन, आर्थिक सहाय्य आणि आवश्यक असल्यास कृत्रिम अवयव, पुनर्वसन उपचार तसेच मानसोपचार सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# महापालिकेत मोठी खळबळ! 'त्या' एका मेसेजमुळे बडा अधिकारी निलंबित

## महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 56 (2) (फ) नुसार विभागीय चौकशी सुरू; आयुक्तांच्या परवानगीशिवाय पुणे सोडण्यास मनाई.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता अशित वेदप्रकाश जाधव यांना मनपा सेवेतून तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय त्यांच्या खातेनिहाय चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत. अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांच्या स्वाक्षरीने हा निलंबन आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशात निलंबनाचे कारण स्पष्ट केले नसले, तरी राजकीय दबाव आणि महापालिका आयुक्तांना केलेला एक मेसेज कारणीभूत असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.

त्यामुळे त्या दिवशी पाणीपुरवठा विभागात किंवा महापालिकेत नेमके काय घडले, याची उलटसुलट चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. दिनांक ११/०७/२०२६ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने जाधव यांच्यावर ही निलंबनाची कारवाई करण्यात येत असल्याचे नायर यांनी दिलेल्या निलंबनाच्या आदेशात म्हटले आहे; परंतु ११ जुलैला नेमके असे काय घडले, जाधव यांनी आयुक्तांना काय मेसेज पाठवला, त्यात मजकूर काय होता, ज्यामुळे जाधव यांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले,

याचा उल्लेख निलंबनाच्या आदेशात करण्यात आलेला नाही. आदेशात केवळ महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ५६ (२) (फ) नुसार त्यांच्यावर विभागीय चौकशीच्या आधीन राहून ही कारवाई करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, या कारवाईबाबत महापालिकेमध्ये सुरू असलेल्या चर्चेनुसार अवघ्या दीड महिन्यांपूर्वीच जाधव यांची पाणीपुरवठा विभागात बदली करण्यात आली होती. मात्र, या बदलीवर ते प्रचंड नाराज होते.

याच नाराजीतून ते महिनाभराच्या प्रदीर्घ रजेवर गेले होते. एक जुलै रोजी ते पुन्हा सेवेत रुजू झाले; परंतु आपल्याला पाणीपुरवठाऐवजी बांधकाम किंवा पथ विभागामध्येच बदली मिळावी, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. येनकेन प्रकारेण ही बदली पदरात पाडून घेण्यासाठी जाधव यांनी एवढा आटापिटा केला, की त्यांनी आयुक्तांवर थेट राजकीय दबाव आणायला सुरुवात केली. त्यानंतरही आयुक्त बधले नाहीत, म्हटल्यावर जाधव यांनी महापालिका आयुक्तांना केलेल्या मेसेजमध्ये आक्षेपार्ह आणि अयोग्य भाषा वापरली. त्यातून दिसलेल्या त्यांच्या निर्ढावलेपणामुळे आणि गंभीर वर्तणुकीमुळे त्यांना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागल्याचेही बोलले जात आहे.




### निलंबनामागील चर्चांना उधाण

» महापालिका वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, पाणीपुरवठा विभागातील बदलीबाबत नाराजी व्यक्त करत अशित जाधव यांनी आयुक्तांवर राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. अपेक्षित बदली न झाल्याने त्यांनी आयुक्तांना पाठविलेल्या संदेशात आक्षेपार्ह भाषा वापरल्याचेही बोलले जात आहे. या कथित वर्तनामुळेच त्यांच्यावर तडकाफडकी निलंबनाची कारवाई झाल्याची चर्चा असली, तरी याबाबत महापालिका प्रशासनाने अधिकृतपणे कोणतीही माहिती जाहीर केलेली नाही.

### निलंबनाची कारवाई

» पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता अशित वेदप्रकाश जाधव यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी झाला असून, त्यांच्याविरुद्ध खातेनिहाय चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत. निलंबन आदेशात कारण स्पष्ट करण्यात आले नसले तरी, ११ जुलै रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत जाधव यांना आयुक्तांच्या परवानगीशिवाय महापालिका हद्द सोडता येणार नाही.

### चौकशीकडे लक्ष

» अतिरिक्त आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार अशित जाधव यांच्यावरील खातेनिहाय चौकशी पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी तातडीने पूर्ण करायची आहे. चौकशी अहवालानंतर पुढील प्रशासकीय निर्णय घेतला जाणार आहे. निलंबनाचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नसल्याने महापालिका प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चौकशीतून संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होणार असून, त्यानंतर दोषी आढळल्यास पुढील शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

# उजनी धरणाने गाठला 50 टक्क्यांचा टप्पा; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## मुसळधार पावसाने वाढली आवक; अवघ्या 24 तासांत साठ्यात 1.06 टक्क्यांची वाढ, पाच तालुक्यांना दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

भीमा नदीच्या खोऱ्यातील सर्वांत मोठे आणि सोलापूर, पुणे तसेच अहिल्यानगर जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेले उजनी धरण रविवारी (दि. १२) दुपारी ४ वाजता ५० टक्क्यांवर पोहोचले. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणात पाण्याची आवक वाढली आहे.

रविवारी दुपारी ४ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार धरणातील उपयुक्त पाणी साठा ५०.०८ टक्के झाला आहे. धरणाची पाणीपातळी ४९४.३२० मीटर असून, उपयुक्त साठा ७५९.८१ दशलक्ष घनमीटर म्हणजेच २६.८३ टीएमसी झाला आहे. धरणाचा एकूण साठा २५६२.६२ दशलक्ष घनमीटर अर्थात ९०.४९ टीएमसी आहे.

शनिवारी (दि. ११) रात्री ९ वाजेपर्यंत हा साठा ४९.०२ टक्के होता. म्हणजे अवघ्या २४ तासांत १.०६ टक्क्यांनी वाढ होऊन धरणाने अर्धशतक गाठले आहे. सध्या दौंड येथे भीमा नदीतून ६ हजार ७८० क्युसेकने पाण्याची आवक सुरू आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरण लवकरच ७५ टक्के आणि नंतर १०० टक्के भरण्याची शक्यता जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.



### मायनसमधून प्लसमध्ये प्रवास

» गेल्या महिन्यात उजनी धरण मृतसाठ्यावर आले होते. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मंगळवारी (दि. ७) रात्री दीड वाजता धरणातील उपयुक्त पाणीसाठा शून्याच्या वर गेला आणि धरण मायनसमधून प्लसमध्ये आले. बुधवारी (दि. ८) सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार धरणातील उपयुक्त पाणीसाठा फक्त १७.२५ टक्के म्हणजेच २६१.७ दशलक्ष घनमीटर/९.२४ टीएमसी इतका होता. त्या वेळी धरणाची पाणीपातळी ४९२.२८० मीटर असून, एकूण पाणीसाठा २०६४.५८ दशलक्ष घनमीटर/७२.८० टीएमसी होता. केवळ ४ दिवसांत उपयुक्त साठ्यात ३२.८३ टक्क्यांची वाढ झाली.

# भांडगावात संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे भक्तिमय स्वागत

## 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला; ग्रामस्थांकडून वारकऱ्यांसाठी सेवाभावाने विविध सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे भांडगाव (ता.दौंड) येथे उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यवत येथील मुक्काम उरकून ग्रामप्रदक्षिणा पूर्ण करून पालखी सकाळच्या न्याहारीसाठी भांडगाव येथे सोमवार दि.१३ जुलै रोजी सकाळी १० वा.१५ मी विसावली. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषाने, टाळ-मृदंगाच्या निनादाने आणि विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भांडगाव मध्ये आगमन झाल्या नंतर पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती पार पडली.

पालखी आगमनाच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पादुकांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या रांगा लावल्या होत्या. वारकरी संप्रदायातील दिंड्यांचे आगमन होताच ग्रामस्थांनी फुलांची उधळण, जयघोष आणि पारंपरिक पद्धतीने पालखीचे जल्लोषात स्वागत केले. महिलांनी औक्षण करून वारकऱ्यांचे स्वागत केले, तर गावातील युवकांनी शिस्तबद्ध नियोजन करून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

वारकऱ्यांच्या भोजनासाठी भांडगाव ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाची व्यवस्था केली होती. यामध्ये १५० किलो पिठलं, २५० किलो भात आणि तब्बल १७ हजार भाकऱ्या तयार करण्यात आल्या. हजारो वारकरी भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. ग्रामस्थांनी एकजुटीने केलेल्या या सेवाभावाचे वारकऱ्यांकडून कौतुक करण्यात आले.

तसेच विलास दोरगे यांच्या 'सावळा व्हेज' च्या वतीने वारकऱ्यांसाठी उत्तम न्याहारीची व्यवस्था करण्यात आली. विविध स्वयंसेवकांनी भाविकांना पिण्याचे पाणी, नाश्ता आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. या प्रसंगी श्री रोकडोबानाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पालखी मार्गावर आकर्षक आणि मनमोहक रांगोळ्या साकारून वारकरी संप्रदायाचे स्वागत केले. रंगीबेरंगी रांगोळ्यांनी परिसर अधिकच भक्तिमय आणि उत्सवी बनला.



### सेवाभावातून जपली वारकरी परंपरा

» पालखी सोहळ्याच्या निमित्ताने भांडगाव ग्रामस्थांनी स्वच्छता, वाहतूक, पिण्याचे पाणी, नाश्ता, महाप्रसाद आणि भाविकांच्या सोयींसाठी नियोजनबद्ध व्यवस्था केली. महिलांनी औक्षण करून वारकऱ्यांचे स्वागत केले, तर युवकांनी शिस्त राखत स्वयंसेवक म्हणून जबाबदारी पार पाडली. स्थानिक संस्था आणि नागरिकांनी एकत्र येत वारकरी सेवेची परंपरा जपली. ग्रामस्थांच्या समन्वयामुळे पालखी सोहळा शांततेत, उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

### महाप्रसादाची भव्य सेवा

» भांडगाव येथे वारकऱ्यांच्या भोजनासाठी ग्रामस्थांनी भव्य महाप्रसादाची व्यवस्था केली होती. यामध्ये सुमारे १५० किलो पिठलं, २५० किलो भात आणि तब्बल १७ हजार भाकऱ्या तयार करण्यात आल्या. हजारो वारकरी भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. ग्रामस्थांनी एकजुटीने सेवा बजावत भोजन व्यवस्थेचे उत्कृष्ट नियोजन केले. या सेवाभावामुळे वारकऱ्यांनी भांडगावच्या आदरातिथ्याचे कौतुक केले. स्वयंसेवकांनी पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था आणि भोजन वितरणही सुरळीत पार पाडले.

### रांगोळ्यांनी फुलला पालखी मार्ग

» पालखी स्वागतासाठी श्री रोकडोबानाथ विद्यालयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी पालखी मार्गावर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. विठ्ठल-रखुमाई, संत तुकाराम महाराज, वारकरी परंपरा आणि वारीच्या संदेशांवर आधारित रंगीबेरंगी रांगोळ्यांनी भाविकांचे लक्ष वेधून घेतले. गावात प्रवेश करताच या कलाकृतींमुळे भक्तिमय वातावरण अधिक खुलले. वारकऱ्यांनी रांगोळ्यांचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली. ग्रामस्थांच्या सहभागामुळे स्वागत सोहळ्याला सांस्कृतिक रंगत लाभली.

# शेतकऱ्यांना जुलैअखेरपर्यंत कर्जमाफी; आयकरदात्या शेतकऱ्यांना योजनेतून वगळणार

## आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ नाही, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना 50 हजारांचे प्रोत्साहन अनुदान

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना जुलै महिना संपण्यापूर्वीच कर्जमाफी देण्यास सरकार कटिबद्ध असून, करदात्या (आयकर भरणाऱ्या) शेतकऱ्यांना मात्र या योजनेचा लाभ मिळणार नाही, अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषीमंत्री भरणे हे आपल्या निवासस्थानी आले असता पत्रकारांनी त्यांना कर्जमाफीबाबत प्रश्न विचारले. यावेळी कर्जमाफीसाठी सरकारकडून 'तारीख पे तारीख' दिली जात असल्याचा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "हे सरकार शेतकरी हिताचा विचार करणारे आहे. वास्तविक पाहता आम्ही कर्जमाफीसाठी ५ जुलै ही तारीख दिली होती. पावसाळी अधिवेशनात २० हजार कोटींचे पुरवणी बजेट मांडून त्यासाठी तरतूदही करण्यात आली आहे. मात्र, दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीच्या निकषांमध्ये बदल करून योजना अधिक स्पष्ट केली."

त्यानुसार, सन २०१९ च्या कर्जमाफीतील शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांची कर्जमाफी दिली जाणार असून, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, यामध्ये करदात्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यासाठी करदात्या शेतकऱ्यांची माहिती केंद्र सरकारकडून मागवण्यात आली असून, त्या प्रस्तावावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची स्वाक्षरी झाली आहे. तो प्रस्ताव आता राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी गेला असून, लवकरच मंजुरी मिळून प्रत्यक्षात कर्जमाफीच्या अंमलबजावणीस सुरुवात होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

"जरी कर्जमाफी देण्यास थोडासा उशीर झाला असला, तरी या बदलांमुळे कर्जमाफीची रक्कम ३६ हजार ५८५ कोटींवरून थेट ४० हजार कोटींवर जाणार आहे. शिवाय, योजनेच्या अंमलबजावणीपूर्वीच लाभार्थींची अचूक पडताळणी झाल्याने नंतर कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत," असे सांगत कर्जमाफीची प्रक्रिया जुलै महिन्याच्या पुढे जाणार नाही, असा ठाम विश्वास कृषीमंत्र्यांनी व्यक्त केला.



### कर्जमाफी जुलैअखेरीसच

» राज्य सरकार जुलै महिना संपण्यापूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी लागू करण्यास कटिबद्ध असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. पावसाळी अधिवेशनात यासाठी २० हजार कोटींच्या पुरवणी अर्थसंकल्पाची तरतूद करण्यात आली आहे. निकषांमध्ये बदल करून अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळेल, असा दावा त्यांनी केला. सरकारने कर्जमाफीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणली असून, आवश्यक प्रशासकीय मंजुरीनंतर अंमलबजावणी सुरू होईल. त्यामुळे जुलैअखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीचा लाभ पोहोचविण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.